आवक क्र.
दिनांक - ०७/ /१९९

राज्यातील ४ विभागीय परिक्षा मंडळा-मार्फत घेण्यात येणाऱ्या इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षेमध्ये गुणवत्तेनुसार प्रत्येकी प्रथम ३ क्रमांक मिळविणाऱ्या अंध, मूक-बधिर, स्पास्टीक/अस्थिव्यंग विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन.
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग:
क्रमांक-इडीडी-१०९१/२०४४/के. नं. ८३/सुधार-२.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २१ ऑक्टोबर, १९९१.

वाचा :- संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अपि/सलिं दाख. ९०-९१/का. २८/२०७, दिनांक १६ जानेवारी, १९९१

शासन निर्णय :- समाजकल्याण विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळामधून अंध, मूक-बधिर स्पास्टीक (अस्थिव्यंग) अपंगांच्या शिक्षणाचा कार्यक्रम राबविला जातो. तसेच सर्वसामान्य शाळामधून शिक्षण घेणाऱ्या अंध, मूक-बधिर, अस्थिव्यंग (स्पास्टीक) मतीमंद मुलांना शिष्यवृत्ती देण्यात येते. या सवलतीचा लाभ घेऊन आज अपंग व्यक्ती शिक्षण घेऊ लागल्या आहेत. अंध, मूक-बधिर (स्पास्टीक) अस्थिव्यंग विद्यार्थ्यांना विशेष शिक्षणाची आवश्यकता असते. स्पास्टीक मुलांच्या हातामध्ये तसेच पायामध्ये दोष असल्याने त्यांना पायाच्या बोटाने लिखाण करावे लागते. अंध, मूक-बधिर अपंगांना तर एस. एस. सी. उत्तीर्ण होण्यासाठी फार प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. या सर्व बाबी विचारात घेऊन अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून १० वी व १२ वी च्या परिक्षेत, मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद विभागीय परिक्षा मंडळामध्ये प्रत्येक विभाग निहाय, गुणवत्ता यादीप्रमाणे अधिक गुण मिळालेल्या प्रत्येकी तीन अंध, मूक-बधिर, स्पास्टीक/अस्थिव्यंग विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याच्या योजनेस शासन मान्यता देत आहे.

या योजनेंतर्गत मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद या चार विभागातील इयत्ता १० वी व १२ वी या वर्गातील अंध, मूक-बधिर व स्पास्टीक/अस्थिव्यंग या तीन प्रकारातील खालीलप्रमाणे एकूण १४४ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येईल.

९५



## इयत्ता १० वी [एस. एस. सी.]

| विभाग | अंध | मूक-बधिर | स्पास्टीक |
|---|---|---|---|
| मुंबई | ३ | ३ | ३ |
| पुणे | ३ | ३ | ३ |
| नागपूर | ३ | ३ | ३ |
| औरंगाबाद | ३ | ३ | ३ |
| | १२ + | १२ + | १२ = ३६ |

एकूण विद्यार्थी ३६

## इयत्ता १२ वी [एच. एस. सी.]

| अपंगत्व | कला | विज्ञान | वाणिज्य |
|---|---|---|---|
| अंध | ३ | ३ | ३ |
| मूक-बधिर | ३ | ३ | ३ |
| स्पास्टीक | ३ | ३ | ३ |
| | ९ + | ९ + | ९ = २७ |

एकूण— २७ विद्यार्थी एका विभागात.
× ४ विभाग [पुणे, मुंबई, नागपूर, औरंगाबाद.]

एकूण, १०८ विद्यार्थी

१० वी व १२ वी चे एकूण विद्यार्थी

३६ + १०८ = १४४

या एकूण १४४ विद्यार्थ्यांचा रोख बक्षिस रु. १०००/- प्रत्येकी प्रमाणे व स समारंभ आयोजित करणेकरिता खालील प्रमाणे रु. २,०१,०००/- [रु. दोन लाख एक हजार फक्त] च्या खर्चास शासन मान्यता देत आहे.

१] रु. १०००/- प्रमाणे विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके

[१,०००/- × १४४] = रु. १,४४,०००/-.

२] प्रवास खर्च
[रु. १०० x १४४]

३] समारंभ आयोजन व भोजन निवास = रु. १४,४००/-
व्यवस्था खर्च रु. [पारितोषिक विजेत्या रु. ३०,६००/-
विद्यार्थ्यांना त्यांचे पालकांसह समारंभात येऊन
आल्यास दिवसाचे भोजन देण्यात येईल.]

४] छपाई खर्च [चार विभागासाठी.] रु. १२,०००/-
व त्या अनुषंगाने येणारा इतर खर्च.

रु. २,०१,०००/-

[ रुपये दोन लाख एक हजार फक्त ]

मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या परिक्षा मंडळ विभागातील विभागीय समाजकल्याण अधिकारी, परिक्षा मंडळाशी संपर्क साधून गुणवत्तेप्रमाणे १० वी व १२ वी च्या अंध, मूक-बधिर, स्पास्टीक/अस्थिव्यंग या प्रवर्गातील गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या [जास्त गुणांक प्राप्त] एकूण विद्यार्थ्यांची यादी तयार करतील. परिक्षा मंडळाच्या विभागातील विभागीय समाजकल्याण अधिकारी, प्रत्येक विभागात स्वतंत्र रित्या सत्कार समारंभाचे आयोजन करतील.

३. या बाबीवर होणारा खर्च वित्तीय शिर्ष "२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण-०२-समाजकल्याण-१०१-अपंग व्यक्तींचे कल्याण-[५] शारिरीक दृष्टया अपंगासाठी खर्ची टाकून इतर योजना-बी-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-मागणी क्र. एन-६" खाली/खर्ची ग.व भाग-१ द्वारे केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. प्र. क्र. ४६८/व्यय-११, दि. २१.६.१९९१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

[ गोरख मेघ ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, महिला, बाल व अपंग विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

कृ.मा.प...४/-

कृ.मा.प...२/-